# मेट्रो ३ चे काम अंतिम टप्प्यात



केंद्र सरकारचे विशेष अधिकारी जयदीप यांनी मेट्रो ३ ची पाहणी केली.

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ या पहिल्या वहिल्या भुयारी मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात असून या मार्गिकेतील आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर अखेरीस सुरू करण्याचे मुंबई मेट्रोचे उद्दिष्ट आहे. या मेट्रो ३ प्रकल्पाची नागरी वाहतूक विभागाचे विशेष अधिकारी जयदीप यांनी पाहणी केली व कामाचा आढावा घेतला.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ चे काम सुरू आहे. हे काम अंतिम टप्प्यात आले असून ३३.५ किमीच्या भुयारी मेट्रो मार्गिकेची इतर काही कामे सुरू आहेत.

- पहिल्या टप्प्यासाठी आवश्यक असणारी शेवटची नववी मेट्रो गाडी गेल्याच आठवड्यात मुंबईत दाखल झाली.
- आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथील एका कारखान्यात मेट्रो ३ च्या गाड्यांची बांधणी करण्यात आली असून या सर्व नऊ गाड्या मुंबईतील आरे कारशेडमध्ये ठेवण्यात आल्या.
- बीकेसी, विद्यानगरी, सीप्झ या मेट्रो स्थानकांची तर आरे डेपोची नागरी वाहतूक विभागाचे विशेष अधिकारी जयदीप यांनी पाहणी केली.
- त्यावेळी एमएमआरसीएलचे इतर अधिकारी उपस्थित होते.